ISSN: 2393-8900 Impact Factor : 2.7825(UIF) Volume - 9 | Issue - 8 | APRIL - 2023

Historicity researcH Journal

# कडधान्य उत्पादन : लातूर जिल्हा आणि लातूर विभाग यांचा तुलनात्मक अभ्यास



**संजयादेवी पवार (गोरे)**
**सहयोगी प्रा., (भूगोल विभाग), श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, लातूर.**

**सारांश :**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये लातूर जिल्ह्यातील आणि एकूण लातूर विभागातील कडधान्य पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकतेचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आलेला आहे. या तुलनात्मक विश्लेषणावरुन असे आढळले की, लातूर जिल्ह्यात कडधान्य लागवडी खालील क्षेत्र उत्पादन आणि उत्पादकता यांच्यात हवी तशी वाढ झालेली नाही.

भारत वाढत्या लोकसख्येसाठी अन्न धान्याची गरज वाढत असून मात्र घेतल्या जाणाऱ्या कडधान्य उत्पादनातून वाढती गरज पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे शासनामार्फत कडधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी अनेक उपाय योजना सूचविण्यात आल्या आहेत. याचाच भाग म्हणून 2007-08 या वर्षी राष्ट्रीय अन्न सूरक्षा अभियान भारतीतील 17 राज्यातील 476 जिल्ह्यात राबविण्यात आले. यातून कडधान्य लागवड क्षेत्र उत्पादन आणि उत्पादकतेत अपेक्षित तेवढा बदल झाला नसला तरी जनजागृतीतूनबदल होण्याची संभावता जाणवते.

**बीज संज्ञा :** कडधान्ये, लागवड, क्षेत्र, उत्पादन, उत्पादकता.

भारतीय शेती हा भारतीयांच्या जिवनाचा आधार आहे. भारतीय नियोजनात शेतीला सामाजिक आर्थिक विकासाशी संबंधीत सर्व घटकांचा केंद्र बिंदू मानला गेला आहे. परंतू 60 व्या दशकात झालेल्या हरितक्रांतीनंतर शेतीत फार मोठा बदल दिसत असला तरी शेती उत्पादनाचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा हिस्सा मात्र सतत घटत असल्याचे दिसून येत आहे. भारतात 1950-51 मध्ये एकूण राष्टीय उत्पन्नात कृषि क्षेत्राचा हिस्सा 56.50 टक्के होता तर 2010-11 मध्ये तो घटत जाऊन 20.10 टक्के पर्यंत कमी आला.

- **संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

1) लातूर जिल्हा आणि एकूण लातूर विभागातील कडधान्य पिकाखालील क्षेत्र यांचे तुलनात्मक अध्ययन करणे.
2) लातूर जिल्हा आणि एकूण लातूर विभागातील कडधान्य पिकाखालील उत्पादन यांचे तुलनात्मक अध्ययन करणे.
3) लातूर जिल्हा आणि एकूण लातूर विभागातील कडधान्य पिकाखालील उत्पादकता यांचे तुलनात्मक अध्ययन करणे.
4) लातूर जिल्ह्यातील कडधान्य पिकाखालील क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यासाठी उपाय योजना सूचविणे.

- **गृहितके :**

1) लातूर जिल्ह्यातील कडधान्य पिकाखालील क्षेत्रात सातत्याने वाढ झालेली दिसून येत नाही.
2) लातूर जिल्ह्यातील कडधान्य उत्पादन मंद गतीने वाढत आहे.

3) लातूर विभागाच्या तुलनेत लातूर जिल्ह्यातील कडधान्य पिकाची उत्पादकता तुलनेने जास्त आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक व व्दितीयक साधन सामुग्रीचा वापर केला असून प्राथमिक साधनात कडधान्य उत्पादक शेतकऱ्यांची चर्चा करुन निरिक्षणे नोंदविली आहेत. तर व्दितीयक सामुग्री विविध संदर्भ ग्रंथ, शासकिय अहवाल, मासिके, वर्तमानपत्र, वेबसाईट यांचा आधार घेतला आहे.

**अभ्यास क्षेत्र :**

लातूर जिल्ह्याची निर्मिती ऑगस्ट 1982 मध्ये झाली असून लातूर जिल्हयाचा विस्तार 180 05' उत्तर ते 190 15' उत्तर अक्षांश आणि 760 25' पुर्व ते 770 35' पुर्व रेखांश आहे. सदरील जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ 7372 चौ.कि.मी. असून लोकसंख्या 28,56,300 (2000) आहे. लातूर जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता 343 प्रति चौ.कि. आहे. यामध्ये लातूर, औसा, निलंगा, उदगीर, अहमदपूर, रेणापूर, देवणी, चाकूर, शिरुळ अनंतपाळ, जळकोट या 10 तालुक्यांचा समावेश होतो. या जिल्ह्याची सरासरी उंची 636 मिटर असून मांजरा, तेरणा, तावरजा नदीखोऱ्यांचा सखल मैदानी प्रदेश, बालाघाट डोंगर व पठारी प्रदेश आढळतो. अर्थात या डोंगराळ प्रदेशात हालकी व मध्यम जमीन आणि नदी खोऱ्याच्या प्रदेशात काळी कसदार रेगूर सुपिक जमीन आढळते.

- **विषय विवेचन :**

लातूर जिल्हा हा प्रामुख्याने कृषि प्रदान असून सुमारे 80 टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. ज्वारी या प्रमुख पिकांसोबत गहू, भरडधान्य / तृणधान्य, तेलबिया व कडधान्यांची पिकेही घेतली जातात. जिल्ह्यात 6.67 लाख हेक्टर जमीन लागवडी खाली असून त्या पैकी 80 टक्के जमीन कोरडवाहू आहे. यामध्ये खरीप हंगामातील कडधान्याच्या पिकाखालील क्षेत्र जास्त आढळते. कडधान्य पिकांमध्ये हरभरा, तूर, मुग, उदिड, वाटाणा, भुईमूग, चवळी, मटकी, मसूर सध्या राजमा इ. पिके घेतली जातात.

संपूर्ण लातूर विभागातील कडधान्य लागवडीखालील क्षेत्राशी लातूर जिल्ह्यातील कडधान्य पिक क्षेत्राचे तुलनात्मक विश्लेषण पूढील प्रमाणे सांगता आढळले.

**तक्ता क्र.01 : लातूर जिल्हा आणि लातूर विभाग : कडधान्य पिकक्षेत्र**

| अ.क्र. | वर्षे | कडधान्य पिकाखालील क्षेत्र (हेक्टर मध्ये) | | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| | | लातूर जिल्हा | लातूर विभाग | |
| 1. | 2015-16 | 1161 | 7060 | 16.45 |
| 2. | 2016-17 | 1449 | 6603 | 21.95 |
| 3. | 2017-18 | 1273 | 5876 | 21.67 |
| 4. | 2018-19 | 1212 | 5361 | 22.61 |
| 5. | 2019-20 | 990 | 4868 | 20.34 |
| 6. | 2020-21 | 1103 | 5340 | 20.66 |

(स्त्रोत : लातूर विभागीय कार्यालय, लातूर)

वरील तक्त्यानूसार असे दिसून आले आहे की, लातूर जिल्ह्यातील इ.सन 2015-16 मध्ये कडधान्य पिकाखालील क्षेत्र 1161 हे असून एकूण लातूर विभागात 7060 हे क्षेत्रावर कडधान्य पिके घेतली गेली. याची तुलना करता शेकडा प्रमाण 16.45 इतके आहे.

इ.सन 2016-17 च्या आंतरराष्ट्रीय कडधान्य महोत्सवाचा परिणाम म्हणून अंतरराष्ट्रीय इतकेच नव्हे तर जिल्हा पातळीवर कडधान्य पिकाखालील क्षेत्र वाढत असल्याचे 2018-19 पर्यंत लक्षात आले. परंतू त्यामध्ये 2020-21 पासून पिक क्षेत्र आणि त्यातील उत्पादन याचे प्रमाणे वाढण्याऐवजी घटलेले दिसून येते ते शेकडा प्रमाण 20.66 इतके आढळलेले.

**तक्ता क्र.02 : लातूर जिल्हा आणि लातूर विभाग : एकूण कडधान्य उत्पादन**

| अ.क्र. | वर्षे | कडधान्य उत्पादन (हेक्टर मध्ये) | | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| | | लातूर जिल्हा | लातूर विभाग | |
| 1. | 2015-16 | 3107 | 8480 | 36.64 |
| 2. | 2016-17 | 1376 | 6503 | 21.16 |
| 3. | 2017-18 | 1244 | 7837 | 15.87 |
| 4. | 2018-19 | 1301 | 5361 | 24.27 |
| 5. | 2019-20 | 1109 | 4868 | 22.78 |
| 6. | 2020-21 | 1457 | 5340 | 27.29 |

(स्त्रोत : लातूर विभागीय कार्यालय, लातूर)

वरील आकडेवारीवरुन असे स्पष्ट होते की, 2015-16 मध्ये लातूर जिल्ह्यात कडधान्याचे उत्पादन 3107 होते तर संपूर्ण लातूर विभागात 8480 मॅट्रिक टन इतके उत्पादन होते. लातूर विभागाच्या कडधान्य उत्पादनाच्या तुलनेत लातूर जिल्ह्यातील उत्पादन शेकडा 36.14 इतके वाढल्याचे दिसून येते. म्हणजेच कडधान्य पिकाखालील क्षेत्रापेक्षा कडधान्य उत्पादनात वाढ झालेली आहे. इ.सन 2020-21 मध्ये लातूर जिल्ह्यात कडधान्य उत्पादन 1457 होते तर लातूर विभागात 5340 मॅट्रिक टन इतके उत्पादन होते. लातूर विभागाच्या कडधान्य उत्पादनाच्या तुलनेत लातूर जिल्ह्याचे कडधान्य उत्पादन 27.29 टक्के इतकेच आहे.

कडधान्य क्षेत्र आणि कडधान्य उत्पादनाप्रमाणेच एकूण लातूर विभागातील वेगवेगळ्यात जिल्ह्यात दर हेक्टरी कडधान्य उत्पादकता एक सारखी दिसून येत नाही. लातूर विभागाच्या तुलनेत एकट्या लातूर जिल्ह्यातील कडधान्याची उत्पादकता पुढीलप्रमाणे असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र.03 : लातूर जिल्हा आणि लातूर विभाग : दर हेक्टरी उत्पादकता**

| अ.क्र. | वर्षे | कडधान्य पिकाखालील क्षेत्र (हेक्टर मध्ये) | | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| | | लातूर जिल्हा | लातूर विभाग | |
| 1. | 2015-16 | 27 | 168 | 16 |
| 2. | 2016-17 | 1154 | 832 | 139 |
| 3. | 2017-18 | 977 | 686 | 71 |
| 4. | 2018-19 | 438 | 406 | 93 |
| 5. | 2019-20 | 1121 | 644 | 58 |
| 6. | 2020-21 | 1322 | 859 | 65 |

(स्त्रोत : लातूर विभागीय कार्यालय, लातूर)

वरील आकडेवारी वरुन असे निदर्शनास येते की, संबंधीत विभागाशी उत्पादकतेची तुलना करता 2015-16 मध्ये लातूर जिल्ह्याची उत्पादकता 27 होती तर लातूर विभागाची 168 कि.ग्रॅ. उत्पादकता होती. यांची तुलना करता शेकडा प्रमाण 16 प्रतिशत इतके आहे. 5 वर्षांनी अर्थात 2020-21 मध्ये लातूर विभागातील लातूर जिल्ह्याचे दर हेक्टरी उत्पादकता 1322 असून लातूर विभागाची उत्पादकता 859 इतकी आहे. त्याची तुलना करता कडधान्य उत्पादकता दर शेकडा 65 इतकी आहे. यावरुन लक्षात येते की, लातूर जिल्हा आणि संपूर्ण लातूर विभाग यांचा तुलनात्मक अभ्यास केला असता कडधान्य लागवडीखालील क्षेत्र आणि कडधान्य उत्पादन व दर हेक्टरी उत्पादकता यामध्ये दर हेक्टरी उत्पादकता निरंतर वाढत असल्याचे दिसत असले तरी एकूण कडधान्य पिकाखालील क्षेत्र मात्र कमी होत असल्याचे दिसून आले आहे.

## निष्कर्ष :

1. संपूर्ण लातूर विभागात लातूर जिल्ह्याचे कडधान्य पिकाखालील क्षेत्र 2015-16 ते 2020-21 पर्यंत जास्त प्रमाणात वाढ दिसून येत नाही.

2. लातूर विभागात लातूर जिल्ह्यातील कडधान्य उत्पादन 2015-16 ते पुर्वी 36.64 इतके शेकडा प्रमाण होते परंतू 2020-21 या वर्षी ते प्रमाण 27.29 इतके खाली आल्याचे दिसून येते.
3. लातूर जिल्हा हा लातूर विभागामध्ये दर हेक्टरी उत्पादकते मध्ये 2015-16 या वर्षी फक्त शेकडा 16 इतके प्रमाण होते ते वाढून 2018-19 पर्यंत शेकडा 93 इतके झाले. परंतू कोव्हिड-19 जागतिक आपत्ती काळानंतर मात्र हि वाढ मंद झालेली दिसून येते.

लातूर जिल्ह्यातील उत्पादकता सातत्याने वाढविण्यासाठी समाजात जागृती करणे काळाची गरज बनली आहे. तरच सुद्दढ लोकसंख्ये करीता सकस प्रोटीन युक्त आहार असले आवश्यक आहे. इ.सन 2007-08 पासून केंद्र सरकार मार्फत राबविण्यात येणाऱ्या अन्न सूरक्षा अभियानात कडधान्य पिकाचे क्षेत्रफळ उत्पादन व उत्पादकता वाढविण्यावर भर दिला आहे. आहारातील कडधान्याची गरज लक्षात घेऊन जनजागृती करिता 2022 हे वर्षे आंतरराष्ट्रीय कडधान्य वर्षे म्हणून साजरे केले. परिणामत: यातून कडधान्य उत्पादन घेण्याकडे व त्याचे आहारातील प्रमाण वाढविण्याकडे लक्ष वेधित करण्यासाठी ग्राम स्तरापासून ते राज्य स्तरापर्यंत विविध स्पर्धा, परिसंवाद, कार्यशाळा, कार्यक्रम घेण्यात आले त्याचा परिणामत: आहारातील कडधान्याचे महत्व लक्षात आले असले तरी शेतकरी वर्गाला कडधान्य पिक लागवड शाश्वत जाणवत नाही.

## उपाययोजना :

1. लातूर जिल्ह्यामध्ये कडधान्य पिक घेण्यासाठी अनुकूल वातावरण असून अनेक शेतकरी हरभरा, तूर, मूग, उदिड यासारखे कडधान्य स्वत:च्या गरजेपुरतेच मिश्र पिक म्हणून उत्पादित करतात. त्याकरिता समाजात जागृती करून कडधान्य पिकाचे आहारातील महत्व लक्षात आणून देण्यासाठी परिसंवाद, चर्चासत्र, कार्यशाळा, कार्यक्रम इत्यादिंचे जास्त प्रमाणात घेण्यात यावे.
2. कडधान्य पिकाचे उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना अधुनिक पिक पध्दतीकरिता जागृत करण्यात यावे.
3. कडधान्य पिकाचे उत्पादन वाढविण्यासाठी सुधारित व बी-बियाणांचा वापर करणेसाठी जागृत करावे.
4. कडधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी असलेल्या शासकिय योजना शेतकऱ्यांपर्यंत पोचवाव्यात.
5. शेतकऱ्यांच्या हिताच्या वेगवेगळ्या शासकिय धोरणांची अंमलबजावणी करण्यात यावी.
6. शेतकऱ्यांच्या कडधान्य पिकाला माफव व योग्य किंमत देण्यात यावी.
7. बाजार पेठेतील मध्यस्थाचे प्रमाण कमी करून शेतकऱ्यांची पिळवणूक थांबवावी.
8. कडधान्य पिक उत्पादन आणि आहारातील वापर वाढविण्याकरिता ग्रामस्तर, शालेय स्तरापासून ते सर्व स्तरापर्यंत जनजागृतीकरणे अत्यंत गरजेचे आहे.

## संदर्भ :

1. दैनिंक सकाळ ॲग्रोवन 10 ऑगस्ट 2020.
2. दैनिंक सकाळ ॲग्रोवन 24 फेब्रुवारी 2015
3. दैनिक लोकमत 25 सप्टेंबर 2015.
4. आर्थिक सर्वेक्षण 2010-11, 2016-16, 2020-21
5. krishi.maharashtra.gov.in
6. लातूर जिल्हा कृषि विभाग, लातूर
7. लातूर विभागीय कार्यालय, लातूर
8. www.mahaagri.gov.in